# रक्ताळलेली वाट



डॉ. सौ. रूपाली सचिन सावळे

सूचित प्रकाशन, अकोला

## 'रक्ताळलेल्या वाटेवरील समर्पण'

'साहित्य' हे समाजाचे प्रतिबिंब आहे. समाजामध्ये हरघडी घडणाऱ्या घटनांचे पडसाद साहित्यामध्ये उमटत असतात. एका अर्थाने त्या समाजामध्ये सामर्थ्य त्या घटनांमध्ये असते. त्या घटनांपासून पूर्णत: फारकत कुठलाही प्रतिभावंत, प्रज्ञावंत, कलावंत घेऊ शकत नाही. त्याचे कारण त्या गोष्टींचा पडताळा करण्याची जबाबदारी पूर्णत: तो आपली समजत असतो. एका अर्थाने त्याचे एक कलावंत या नात्याने विचार करणे संयुक्तिकही असते. त्यामुळे तो व्यक्त होत असतो. त्याच्या व्यक्त होण्याच्या अवस्था म्हणजे साहित्य असते. त्यात कवी म्हणून कादंबरीकार, नाटककार, कथाकार, चरित्र-आत्मचरित्रकार म्हणून तो आपली भूमिका अत्यंत इमानेइतबारे पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या समाजाचे वास्तव चित्र तो समाजापुढे मांडण्याचा, ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याच्या प्रकटीकरणा नंतरच्या उठणाऱ्या प्रतिक्रियांचा, परिणामांचा तो विचार करीत नाही. जे सांगायचे ते एक समाजघटक म्हणून तो सांगत जातो. कारण त्याला एक सम्यक समाज अभिप्रेत असतो. याच पाऊल वाटेवरील एक महत्त्वाचे नाव म्हणजे 'स. म. ओईम्बे' हे होय. एक कवी म्हणून साहित्य विश्वाने त्यांच्या नावाची नोंद केव्हाच घेतली आहे. त्यांचे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. एक कवी म्हणून ते साहित्यविश्वाला परिचित आहेत; परंतु 'रक्ताळलेली वाट' या नावाने आलेली त्यांची लघू कादंबरी हा एक नवा वाङ्मयीन प्रकार त्यांनी अत्यंत समर्थपणे पेलण्याचा यशस्वी

लघू कादंबरी : **रक्ताळलेली वाट**

**Raktalaleli Wat !**

**मूळ लेखक : स.म. ओईम्बे**

**S. M. Oimbe**

© **डॉ. सौ.रुपाली सचिन सावळे**

कपिलवस्तू नगर, अकोला

ता. जि. अकोला- ४४४ ००४ (महाराष्ट्र)

मो.९८५०३६३८२०

**प्रकाशक : सूचित प्रकाशन, अकोला**

४६, न्यू महसूल कॉलनी, रिजनल वर्कशॉपच

मागे, खडकी बु. अकोला- ४४४ ००४,

**मो. ९९२२९२४६८४**

कॉम्प्युटराईज : **मेघा कॉम्प्युटर्स**

**सौ. सुनंदा पंजाबराव वर, अकोला.**

पहिली आवृत्ती : **१० जानेवारी २०१९**

मुद्रक : **श्रीकृपा प्रिंन्टर्स, अकोला**

सहयोग राशी : **१५०/- रुपये**

(सर्व हक्क **डॉ.सौ. रुपाली सचिन सावळे** यांच्या स्वाधीन)

प्रयत्न केला आहे.

स. म. ओईम्बे हे मुख्य वित्त लेखा तथा वित्त अधिकारी जि.प. यवतमाळ येथे कार्यरत होते. वेगळ्या क्षेत्रात कार्यरत असूनही साहित्याबद्दलचे त्यांचे भान कमालीचे आहे. तसे बघितले तर कुठलेही क्षेत्र हे माणसांच्या प्रज्ञेला मर्यादा घालू शकत नाही. हे त्यांच्या लेखनाकडे पाहून स्पष्ट होते. त्यांचा या निमित्ताने समाजातील माणसांशी आलेला संबंध त्यांच्या साहित्य सेवेला कारणीभूत ठरलेला दिसून येतो. केवळ संबंध येऊनही चालत नाही तर संवेदना तिव्र असाव्या लागतात. याची जाणीव प्रकर्षाने त्याच्या साहित्यातून स्पष्ट होत जाते.

'रक्ताळलेली वाट' ही लघू कादंबरी एकाच वेळेस तीन पिढ्यांची जीवन संघर्ष उभा करण्याचा प्रयत्न करते. त्यातील पहिली पिढी ही शिवाची आणि त्याच्या बायकोची आहे, दुसरी पिढी ही तुकाराम आणि त्याची बायको रुक्मिणीची आहे. तिसरी पिढीही अतुल आणि देवयानी यांची आहे. सूत्रधार म्हणून येणाऱ्या या पिढ्यांचा विचार करतानाच काही पात्रांची उभारणी सहाय्यकाच्या भूमिकेमध्ये या कादंबरीत पाहायला मिळते. नैतिकता ही महत्त्वाची बाब आहे. ही नैतिकता संस्कांराना घेऊन प्रसवते व एक निरंतर छाप समाजावर सोडून जाते.अपेक्षा हीच की तिचे अनुकरण व्हावे व समाज संपन्न व्हावा, समृद्ध व्हावा. माणसाला माणूस म्हणून जगता यावं, माणसांमध्ये असणारा तुटकपणा, अनाचार, स्वैराचार कुठेतरी थांबावा आणि सुरू व्हावा प्रवाह मानवतेचा. ही आस कादंबरीच्या पानापानामधून व्यक्त होत जाते.

खेड्यात राहणारा माणूस कादंबरीकाराच्या दृष्टीने नायक ठरतो.

मुख्य पात्र ठरतो. किंबहुना हिरो ठरतो. हिरोपणाचे काही निश्चित असे संकेत साहित्याने मान्य केले नाही. जे साहित्य मान्य करीत होते ते कालबाह्य झाले. माणसांचा विचार करणारे साहित्य त्यातून पुढे आले. त्याचे बोलके रूप म्हणजे ही लघू कादंबरी होय.

तुकाराम या कादंबरीचा नायक आहे, तो शिवाचा मुलगा आहे. शिवा हा हातात पडेल ते काम प्रामाणिकपणाने करणारा; परंतु त्याच्यावर गुदरलेल्या प्रसंगाने अ़खंड मानवतेला विचार करायला प्रवृत्त केलेलं दिसून येते. गावातील पोलीस पाटलाचा बैल चोरीला जातो आणि त्याचा आळ शिवावर घेतल्या जातो. शिवा जिवाच्या आकांताने आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करतो; परंतु त्याच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन जमावाकडून त्याच्यावर हल्ला होतो व त्यात त्याचे दोन्ही डोळे जातात व तो कायमचा आंधळा होतो. असे असले तरी या समाजातील डोळसांच्या डोळ्यात विचारांचे झणझणीत अंजण घालून तो जातो. याच करारी शिवाचा तुकाराम हा मुलगा. आपल्या अंत:करणात दुर्दम्य स्वप्न घेऊन त्याला उबवणारा, पूर्ण करण्याचा ध्यास घेणारा, सैन्यामध्ये भरती होतो आपल्या आई-वडिलांना आनंदाचे दिवस देऊ पाहणारा, त्यांचे म्हातारपण सुसह्य करणारा, समृद्ध करणारा. कुटूंबाची जाणीव असणारा, समाजाची जाणीव असणारा त्याही उपर देश सेवेची जाणीव असणारा ध्येयवेडा, तुकाराम हे पात्र तसे विलक्षण आहे. एकाच वेळेस तो अनेक गोष्टींचा विचार करतो. तो विचारवंतही शोभावा असाच आहे. समाजामध्ये असणारी जात व्यवस्था नाहिशी व्हावी या विचाराने प्रेरित झालेला तुकाराम, आपल्याला आलेल्या

एका अनुभवाने स्तंभित होतो. गावात दरोडा पडलेला. त्याची जाणीव तुकारामला होते. तो नुकताच सैन्यातून आपल्या गावी सुट्टीवर आलेला आहे. दरोडेखोरांच्या मागावर जातो. बाकी पळून जातात. एक विहिरीमध्ये उडी घेतो. त्यामागे आपणही उडी घ्यावी असे त्याला वाटते परंतू जात आडवी येते व तो थांबतो. गावातील काही शिकलेली मुले तुकारामला विहिरीत उडी मारण्यास सांगतात व तुकाराम काम फत्ते करतो. शिकणारी नवी पिढी जातींच्या पलीकडचा विचार करते आहे याचे स्पष्टीकरण लेखक देतात.

तुकाराम हा आपल्या कुटुंबाच्या संदर्भात संवेदनशील आहे. त्याची ही संवेदनशीलता समाजातील इतर घटकांच्या संदर्भातही पाहायला मिळते. सगळी आपली माणसे आहेत ही भावना त्याची आहे. याच भावनेने तो समाजामध्ये वावरतो. सुटीवर घरी येताना गाडीमध्ये खंजिरीच्या तालावर गाणे म्हणून लोकांना भिक्षा मागणाऱ्या याचकाला तो निराश करीत नाही. तो त्याच्या हातावर दहा पैशाचे नाणे टाकतो. त्याला तो दोन्ही डोळ्यांनी अंध असणारा भिकारी आपल्या बापासारखा वाटतो. गाडीमध्ये आपल्या बाजूला बसलेल्या बाईचे मूल ओकारी देते, वांती करते, काही भाग त्याच्या अंगावर पडतो. ती बाई त्याच्याकडे अपराध्यासारखी पाहायला लागते. त्याच वेळेस त्याच्या मनामध्ये हा विचार येतो की या ठिकाणी आपला मुलगा असता तर? अनेकदा मानवी वातावरण व्यक्ती वर्तनावर परिणाम करीत असते. ज्या वातावरणात ती वातावरणाच्या आवरणात आपल्या आयुष्याच्या क्षणांना व्यतीत करण्याचा प्रयत्न करते, ते कृतीच्या माध्यमातून प्रकटत जाते. एका अर्थाने तुकारामला मिळालेले

संस्कार त्याचे वातावरण होऊन जाते. त्यामुळे इतरांपेक्षा त्याच्या मनात घृणा निर्माण न होता सौहार्द निर्माण करते व सर्व माणसे त्याला आपल्या माणसांसारखीच वाटायला लागतात.

'रक्ताळलेली वाट' ही लघू कादंबरी केवळ तुकारामच्या कुटुंबाभोवतीच फिरू लागते असे ठामपणे म्हणता येत नाही, त्याचे कारण तिला इतरांना आपल्या कवेत घ्यायला आवडते. त्याचे चित्र रुक्मिणी आणि तिचा भाऊ पंढरी तिचे बाबा सुदामा व आई सरू याच्या कर्मकहाणीच्या पापुद्र्याला उलगडते. जो संघर्ष ज्याला आपण आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक म्हणू तो इथेही आहे. आपलं समाजातील स्थान भक्कम करण्यासाठी व आपली कुवत सिद्ध करण्यासाठी ही माणसे प्राणपणाने आव्हानांवर तुटून पडलेली आहेत. आपल्या पोटी आलेल्या अतुलला आणि आपल्या लाडक्या बायकोला रुक्मिणीला आपल्या आयुष्याचा फारसा वेळ तुकाराम देऊ शकत नाही की ज्यावर त्यांचा अधिकार आहे. आपल्या लेकराला व बायकोला आईवडिलांच्या सुपूर्द करून तो देशसेवेसाठी कर्तव्यावर निघून जातो. तो कायमचाच. तो देशासाठी स्वत:च्या प्राणाची आहुती देतो. तर दुसरीकडे रुक्मिणीची आई आजारी आहे. त्यातच तिचेही निधन होते व बाप सुदाम एकटा पडतो. इकडे ती एकटी पडते. तुकारामशिवाय. एकानंतर एक आलेल्या संकटांना तिला पराभूत करायचे आहे. त्यासाठी ती आपल्या भाऊची पंढरीची मदत घेऊ पाहते. पंढरी स्वार्थांध नाही. कारण त्याच्या आयुष्यातही त्याने अनेक यातनांना हसत-हसत पचवलेलं असते. त्यामुळे तो बहिणींच्या मुलावरलक्ष केंद्रित करतो. त्याला शिकवतो.

अतुल आईचे आणि मामाचे श्रम वाया जाऊ देत नाही व दहाव्या वर्गात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतो.

ही कादंबरी शेवटी कमालीची गती घेते. अतुलला आपल्या बाबांसारखीच देशसेवा करायची आहे. त्यामुळे तो सैन्यात अधिकारी म्हणून रुजू होतो. त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या बापाचे कर्तृत्व आहे. त्यामुळे वंचितांना मदत करण्याची जाणीव त्याला आहे. आपल्या मुलाला आपण अधिकारी बनवणार व त्यांचे स्वप्न (तुकाराम) पूर्ण करणार अशी म्हणणारी रुक्मिणी कणखर वाटते. एक स्त्री या सर्व आघाड्यांवर यशस्वी होते. ही बाब वाचकांच्या लक्षात येते. अतुलच्या लग्नाची लगबग सुरू होऊन सर्वांना आनंदाचे दोन क्षण जगता येतात. शेवटी माणसांना जीवनाकडून हवं तरी काय असते. आपल्या वाट्याला लावलेलच माणसं जगत असतात व आपला दिवस गोड करण्याचा प्रयत्न करीत असतात. अतुलचे लग्न देवयानीसोबत केले जाते. तीसुद्धा सैन्यातल्या अधिकाऱ्याची मुलगी आहे. जे बोल समाज मानसिकतेतून प्रकटतात ते रुक्मिणासोबतच तिच्याही वाट्याला येतात; पण ती त्याला मोठ्या धैर्याने सामोरे जाते. अतुल काही दिवसानंतर आपल्या कर्तव्यावर रुजू होण्यासाठी जातो व त्यालाही वीरगती प्राप्त होते. मागे उरते ती रुक्मिणी, देवयानी आणि तिच्या पोटात वाढणारे बाळ. ही कादंबरी जिथे संपते तिथून वाचकांच्या मनात ती सुरू होते हे कादंबरीचे यश म्हणावे लागेल.

**- प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे**

## लेखकाचा परिचय



दिवंगत सहदेवराव महादेवराव ओईम्बे

**'रक्ताळलेली वाट' शौर्यकथेचे मूळ लेखक दिवंगत सहदेवराव महादेवराव ओईम्बे यांची लहान मुलगी डॉ. सौ. रूपाली सचिन सावळे हिने उर्वरित लिखाण पूर्ण केले.**

| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | २७ मार्च १९४३ |
| **व्यवसाय** | : | शासकीय नोकरी, भंडारा येथे जिल्हा कोषागार अधिकारी, आणि महाराष्ट्रातील विविध जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी |
| **जिवन संगिनी** | : | श्रीमती मालतीताई स. ओईम्बे |
| **अपत्य** | : | |
| **तीन मुली** | : | १) सौ. वैशाली महेंद्र शिरसाट<br>२) सौ. दिपाली रवी नाईक<br>३) डॉ. सौ. रूपाली सचिन सावळे |
| **दोन मुले** | : | १) आनंद स. ओईम्बे<br>२) राहुल स. ओईम्बे |
| **साहित्य संपदा** | : | तीन काव्यसंग्रह प्रकाशित<br>१) चैत्रपल्लवी -१९८५<br>२) मधुमालती -१९८७<br>३) आंबे मोहोर -१९८८<br>'सिद्धार्थची यशोधरा (अप्रकाशित)<br>रक्ताळलेली वाट -२०१९ |
| **समाजकार्य** | : | कास्ट्राईब संघटना व इतर संघटनांमध्ये सक्रिय सहभाग |
| **छंद** | : | दैनिक वर्तमानपत्रे, विविध मासिके वाचन, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यात सहभाग. |
| **निधन** | : | १२ जुलै १९९८ |

सूचित प्रकाशन, अकोला